करिअर मार्गदर्शक

ठळक वैशिष्ट्ये:

- 66 वेगवेगळ्या क्षेत्रांमधील करिअरविषयी सविस्तर माहिती.
- प्रत्येक क्षेत्रातील करिअरच्या संधींविषयी विस्तृत माहिती.
- प्रत्येक क्षेत्रातील अभ्यासक्रम व ते राबवणाऱ्या संस्थांविषयी माहिती.
- उपयुक्त वेबसाइट्सचा समावेश.
- विविध क्षेत्रांतील 39 नामांकित व्यक्तींचे व्हिडिओजच्या माध्यमातून मार्गदर्शन.

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.

P.O. No. 97063

11240_12330_JUP

अनुक्रमणिका

क्र.	करिअर		पृष्ठ क्र.
	करिअर कसे निवडावे?		1
	यशस्वी जीवनाची गुरूकिल्ली योग्य करिअरची निवड!		5
	व्यवसाय पाहावा करून!		7
1.	स्पर्धा परीक्षेतील करिअर (Competitive Exams)		9
	I.	संघ लोकसेवा आयोग (UPSC)	9
	II.	महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC)	16
	III.	कर्मचारी निवड आयोग (Staff Selection Commission)	21
	IV.	बँक आणि इन्शुरन्स क्षेत्रातील करिअर	24
2.	भारतीय सैन्यदलातील करिअर (Armed Forces)		30
	I.	भूदलातील करिअर	31
	II.	नौदलातील करिअर	35
	III.	वायुदलातील करिअर	38
	IV.	महिलांसाठी सैन्यदलातील करिअरच्या संधी	43
	V.	निमलष्करी दलांमधील करिअर	45
3.	वैद्यकशास्त्र (Medical science)		47
4.	दंतवैद्यकशास्त्र (Dentistry)		53
5.	पशुवैद्यक (Veterinary)		57
6.	नर्सिंग (Nursing)		60
7.	मानसशास्त्र (Psychology)		63
8.	पूरक वैद्यकीय सेवा (Paramedical Courses)		67
9.	रिहॅबिलिटेशन थेरपी (Rehabilitation Therapy)		71
10.	अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान (Engineering and Technology)		74
11.	कॉम्प्यूटर्स आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (Computers And Information Technology)		80
12.	वेबमास्टर्स (Webmasters)		85
13.	प्लास्टिक इंजिनीअरिंग (Plastic Engineering)		87
14.	फायर इंजिनीअरिंग (Fire Engineering)		89
15.	टेलिकम्युनिकेशन (Telecommunication)		92
16.	औद्योगिक प्रशिक्षण संस्था (Industrial Training Institute)		94
17.	आर्किटेक्चर (Architecture)		98
18.	इंटिरिअर डिझायनिंग (Interior Designing)		101
19.	औद्योगिक रचना (Industrial Designar)		103
20.	जैव-तंत्रज्ञान (Bio-Technology)		105
21.	जनुकशास्त्र (Genetics)		109
22.	कृषी क्षेत्रातील करिअर (Agriculture)		112
23.	दुग्धशास्त्र व तंत्रज्ञान (Dairy Science & Technology)		117
24.	मत्स्यपालन / मत्स्यउद्योग (Fishery Science)		120
25.	वनिकी क्षेत्र (Forestry)		122
26.	सनदी लेखापाल (Chartered Accountant)		125

27.	कंपनी सेक्रेटरी (Company Secretary)	130
28.	कॉस्ट अकाऊंटंट (Cost Accountant)	133
29.	वित्तीय सेवा (Financial Services)	136
30.	व्यवस्थापन (Management Studies)	139
31.	इव्हेंट मॅनेजमेंट (Event Management)	143
32.	आतिथ्य व्यवस्थापन (Hospitality Management)	145
33.	मानववंशशास्त्र (Anthropology)	149
34.	पुरातत्त्वशास्त्र (Archaeology)	151
35.	खगोलशास्त्र (Astronomy)	154
36.	भूवैज्ञानिक शास्त्रज्ञ / भूशास्त्रज्ञ (Geoscientist)	157
37.	रत्नशास्त्र (Gemology)	161
38.	पॉप्युलेशन सायन्सेस (Population Sciences)	165
39.	व्यावसायिक वैमानिक (Commercial pilot)	167
40.	हवाई वाहतूक नियंत्रक (Air Traffic Controller)	169
41.	फ्लाईट अटेंडंट (Flight Attendant)	170
42.	एअरक्राफ्ट मेंटेनंस इंजिनीअरिंग (Aircraft Maintenance Engineering)	172
43.	मर्चंट नेव्ही (Merchant Navy)	174
44.	जनसंपर्क (Public Relations)	177
45.	जाहिरात (Advertising)	180
46.	प्रकाशन क्षेत्र (Publication)	183
47.	प्रसारमाध्यमातील करिअर (Media – Print, Radio And Television)	185
48.	प्रिंटिंग टेक्नॉलॉजी (Printing Technology)	191
49.	कला क्षेत्रातील संधी (Fine Arts / Applied Arts)	196
50.	ॲनिमेशन (Animation)	199
51.	छायाचित्रण (Photography)	204
52.	मॉडेलिंग (Modelling)	207
53.	फॅशन (Fashion)	209
54.	सौंदर्यप्रसाधनकार (Beautician)	212
55.	चित्रपट (Movie)	214
56.	अभिनय (Acting)	217
57.	नृत्य (Dance)	221
58.	संगीत (Music)	225
59.	होमसायन्स (Home Science)	229
60.	ग्रंथालय शास्त्र (Library Science)	234
61.	परदेशी भाषा (Foreign Language)	237
62.	कायदा (Law)	242
63.	क्रीडा (Sports)	246
64.	शिक्षणशास्त्र (Education)	251
65.	मुक्त विद्यापीठ (Open Universities)	259
66.	राजकारण (Politics)	268
	शिक्षक ते महापौर	271
	आवाहन - देशाच्या राजकारणाला सुशिक्षित युवकांची गरज	273

1

स्पर्धा परीक्षेतील करिअर (Competitive Exams)

I. संघ लोकसेवा आयोग (UPSC)

1. UPSC द्वारे (केंद्रीय लोकसेवा आयोग) घेतली जाणारी नागरी सेवा परीक्षा

क्षेत्राची ओळख

प्रशासनामध्ये अधिकारपदाची जागा मिळवून देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये प्रत्यक्ष आणि मूलभूत योगदान देण्याची संधी देणारी महत्त्वाची परीक्षा म्हणजे UPSC द्वारे अखिल भारतीय स्तरावर घेतली जाणारी नागरी सेवा परीक्षा होय. प्रचंड विस्तार असलेल्या आपल्या देशाचा प्रशासकीय कारभार सुलभपणे चालवणे हे अत्यंत आव्हानात्मक काम आहे. अनेकदा आपण सरकारबद्दल, शासकीय यंत्रणेच्या कारभाराबद्दल नाराजीचा सूर लावत असतो. आपल्याला जर व्यवस्थेमध्ये बदल अपेक्षित असतील, तर बाहेरून टिकाटिपण्णी करण्यापेक्षा यंत्रणेत सहभागी होऊन, यंत्रणेचा भाग बनून काम केले पाहिजे. यंत्रणेत आमूलाग्र बदल करायचे असतील, तर सर्वोच्च अधिकारी पदावर काम करण्याशिवाय गत्यंतर नाही. अनेकदा आपल्याकडे खूप अभिनव अशा कल्पना असतात; पण यंत्रणा आणि अधिकारांच्या अभावी आपण त्या रावबू शकत नाही. UPSC परीक्षेद्वारे केल्या जाणाऱ्या नेमणुका म्हणजे अशा अधिकारी पदावर काम करण्याची एक सर्वोत्तम संधी आहे.

क्षेत्रातील संधी

नेमणूक होणारी पदे: UPSC ची ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यास जिल्हा दंडाधिकारी आणि जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिकेचे आयुक्त, विभागीय आयुक्त, केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध विभागांचे मुख्य सचिव, शासकीय महामंडळांचे संचालक, जिल्हा पोलीस अधीक्षक, पोलीस महासंचालक अशा जिल्हा, राज्य आणि केंद्रीय पातळीवरील प्रशासन यंत्रणेमध्ये जबाबदारी आणि अधिकाराच्या पदांवर काम करण्याची संधी मिळते.

परीक्षेचे महत्त्व: देशात होणाऱ्या शासकीय स्तरावरील सर्व परीक्षांमध्ये UPSC द्वारे घेण्यात येणारी परीक्षा ही सर्वोच्च परीक्षा मानली जाते. त्यामुळेच, ही परीक्षा उत्तीर्ण होणे ही अत्यंत अभिमानास्पद गोष्ट समजली जाते. अखिल भारतीय स्तरावर होणाऱ्या या परीक्षेसाठी दरवर्षी देशभरातून लाखो विद्यार्थी बसतात. भारतासारख्या विस्तृत भौगोलिक विस्तार, प्रचंड लोकसंख्या आणि सांस्कृतिक विविधता असलेल्या देशाला एकसंध ठेवून आणि कारभार सुरळीतपणे चालण्यासाठी UPSC च्या निवड प्रक्रियेतून निवड होऊन देशभर नेमणुका झालेला अधिकारी वर्ग अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. आपल्या अभिनव कल्पना राबवण्याची संधी UPSC परीक्षेतून निवड झालेल्या अधिकार पदांवर नेमणूक झाल्यास आपल्याला मिळू शकते.

पात्रता आणि कालावधी

भारतातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी एवढीच कमीतकमी शैक्षणिक पात्रता आवश्यक समजली जाते. पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत अशा तीन टप्प्यांमध्ये एकूण 2050 गुणांची परीक्षा असते. या परीक्षेत अंतिम निवड होईपर्यंत एक वर्षाचा कालावधी लागतो. साधारणत: मे महिन्यात पूर्व परीक्षेचे अर्ज निघतात. पूर्व परीक्षा ऑगस्ट महिन्यात घेतली जाते. मुख्य परीक्षा डिसेंबर महिन्यात, तर मुलाखत साधारण मार्च महिन्यात आयोजित केली जाते. अंतिम निकाल मे महिन्यात जाहीर केला जातो.

वयोमर्यादा आणि अटेम्प्ट: किमान 21 वर्षे पूर्ण.

गट	वयोमर्यादा	अटेम्प्ट
खुला गट (ओपन)	32 वर्षे	6
इतर मागासवर्गीय (ओबीसी)	35 वर्षे	9
अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती (एससी / एसटी)	37 वर्षे	वयोमर्यादा असेपर्यंत

परीक्षेबाबत महत्त्वाचे:

- केंद्रीय स्तरावरील गट 'अ' आणि गट 'ब' अशा एकूण 24 सेवांसाठी ही परीक्षा घेतली जाते.
- पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मुख्य परीक्षेचा अर्ज भरताना खाली दिलेल्या सेवांच्या निवडीचा प्राधान्यक्रम उमेदवाराला नमूद करावा लागतो.
- उमेदवाराने दिलेल्या या सेवांच्या प्राधान्यक्रमानुसार अंतिम गुणांचा कट ऑफ आणि प्रत्येक सेवेसाठी त्यावर्षी भरली जाणारी पदे यांनुसार उमेदवाराची अंतिम निवड केली जाते.

	गट अ - सेवा
1.	इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस
2.	इंडियन फॉरेन सर्व्हिस
3.	इंडियन पोलीस सर्व्हिस
4.	इंडियन पोस्ट ॲण्ड टेलिग्राफ अकाऊंट आणि फायनॅन्स सर्व्हिस
5.	इंडियन ऑडिट ॲण्ड अकाऊंट सर्व्हिस
6.	इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिस (कस्टम्स ॲण्ड सेंट्रल एक्साइज)
7.	इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिस (आय.टी)
8.	इंडियन डिफेन्स अकाऊंट्स सर्व्हिस
9.	इंडियन ऑर्डनन्स फॅक्टरीज सर्व्हिस (असिस्टंट वर्क्स मॅनेजर, ॲडमिनिस्ट्रेशन)
10.	इंडियन पोस्टल सर्व्हिस
11.	इंडियन सिव्हिल अकाऊंट्स सर्व्हिस
12.	इंडियन रेल्वे ट्रॅफिक सर्व्हिस
13.	इंडियन रेल्वे अकाऊंट्स सर्व्हिस
14.	इंडियन रेल्वे पर्सोनेल सर्व्हिस
15.	इंडियन रेल्वे प्रोटेक्शन फोर्स (असिस्टंट सिक्युरिटी कमिशनर)
16.	इंडियन डिफेन्स इस्टेट्स सर्व्हिस
17.	इंडियन इन्फॉर्मेशन सर्व्हिस (ज्युनिअर ग्रेड)
18.	इंडियन ट्रेड सर्व्हिस, ग्रुप ए (ग्रेड III)
19.	इंडियन कॉर्पोरेट लॉ सर्व्हिस
	गट ब – सेवा
1.	आर्म्ड फोर्सेस हेडक्वॉर्टर सिव्हिल सर्व्हिस (सेक्शन ऑफिसर्स ग्रेड)
2.	दिल्ली, अंदमान आणि निकोबार बेटे, लक्षद्वीप, दीव आणि दमण, दादरा आणि नगर हवेली सिव्हिल सर्व्हिस
3.	दिल्ली, अंदमान आणि निकोबार बेटे, लक्षद्वीप, दीव आणि दमण, दादरा आणि नगर हवेली पोलीस सर्व्हिस
4.	पाँडिचेरी सिव्हिल सर्व्हिस
5.	पाँडिचेरी पोलीस सर्व्हिस

2. प्रादेशिक ग्रामीण बँकांमधील करिअर

देशात एकूण 56 प्रादेशिक ग्रामीण बँका असून त्यांपैकी विदर्भ कोकण ग्रामीण बँक, नागपूर आणि महाराष्ट्र ग्रामीण बँक, औरंगाबाद या दोन महाराष्ट्रातील प्रादेशिक ग्रामीण बँका आहेत. या बँकांमध्ये नोकरी करण्यासाठी त्यासाठीची परीक्षा उत्तीर्ण होण्याबरोबरच आयबीपीएसद्वारे निश्चित केलेल्या संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या भाषेत प्रावीण्य असणेही आवश्यक मानले जाते. उदा. महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक ग्रामीण बँकेत नोकरी करण्यासाठी मराठी भाषा लिहिता, वाचता आणि बोलता आली पाहिजे. आयबीपीएसद्वारे 1. ग्रुप ए-ऑफिसर्स (स्केल 1, 2 आणि 3) 2. ग्रुप बी-ऑफिस असिस्टंट (मल्टीपर्पज) या पदांसाठी वर दिलेल्या स्वरूपातच परीक्षांचे आयोजन केले जाते.

3. सहकारी बँकांमधील करिअर

आपल्या देशात आणि राज्यातही बँकिंग व्यवसाय सहकारी तत्त्वावर मोठ्या प्रमाणावर केला जातो. सहकारी तत्त्वावर यशस्वीपणे चालणाऱ्या अनेक बँका आपल्या राज्यात आहेत. उदा. सारस्वत बँक, ठाणे जनता सहकारी बँक, पुणे जनता सहकारी बँक इत्यादी. या बँका स्वतंत्रपणे परीक्षा घेऊन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची भरती करतात. राज्यातील आघाडीच्या वृत्तपत्रांमध्ये त्याबाबतची जाहिरात प्रकाशित केली जाते.

4. खाजगी बँकांमधील करिअर

गेल्या दोन दशकांमध्ये देशातील खाजगी बँकांचे क्षेत्रदेखील मोठ्या प्रमाणावर विस्तारले आहे. या बँकांमध्ये भरतीची स्वतंत्र यंत्रणा असते. देशातील आणि राज्यातील आघाडीच्या विशेषत: इंग्लिश वृत्तपत्रांमध्ये त्याबाबतची जाहिरात प्रकाशित केली जाते.

बँकेच्या परीक्षांसाठी महत्त्वाच्या वेबसाइट:

i. http://www.ibps.in/crp-rrb-vi/
ii. https://www.sbi.co.in/careers/ongoing-recruitment.html#page_join_sbi
iii. https://opportunities.rbi.org.in/Scripts/Vacancies.aspx
iv. https://www.nabard.org/careers-notices.aspx?cid=545&id=26

5. सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यांमधील करिअर

आजच्या धकाधकीच्या जगात विमाक्षेत्र झपाट्याने विस्तारत आहे. खाजगी क्षेत्रातील विमा कंपन्यांच्या संख्येतही झपाट्याने वाढ होत आहे. तरीदेखील बहुसंख्य नागरिक अजूनही सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनीमध्ये पॉलिसी काढण्याला प्राधान्य देतात. त्यामुळेच, सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यांमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या उपलब्ध होतात.

क्षेत्रातील संधी

लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एलआयसी), ओरिएंटल इन्शुरन्स, नॅशनल इन्शुरन्स आणि युनायटेड इंडिया इन्शुरन्स या देशातील सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्या आहेत. या चारही कंपन्या स्वतंत्रपणे कर्मचारी, अधिकारी आणि विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करतात.

पदे: असिस्टंट, असिस्टंट ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, ॲप्रेटाईस डेव्हलपमेंट ऑफिसर, डेव्हलपमेंट ऑफिसर.

परीक्षेचे स्वरूप: आयबीपीएसद्वारे घेतल्या जाणाऱ्या बँकांसाठीच्या परीक्षेप्रमाणेच ही परीक्षा घेतली जाते. त्यामुळे, बँकेच्या परीक्षांसाठी तयारी करणारे उमेदवार त्याच अभ्यासात इन्शुरन्स क्षेत्राशी संबंधित परीक्षादेखील देऊ शकतात.

विमा कंपनीच्या परीक्षांसाठी महत्त्वाच्या वेबसाइट:

i. https://www.licindia.in/Bottom-Links/careers
ii. https://orientalinsurance.org.in/web/guest/careers
iii. https://nationalinsuranceindia.nic.co.in/portal/page/portal/Corporate/Home/Recruitment Page
iv. https://uiic.co.in/careers/recruitment

[टीप: इन्शुरन्स एजंट हा ग्राहकांपर्यंत थेट पोहोचणारा आणि इन्शुरन्स व्यवसायाचा विस्तार करणारा एक महत्त्वाचा घटक आहे. त्याने नोंदवलेल्या पॉलिसींच्या प्रमाणात त्याला मानधन मिळते. पूर्णवेळ कार्यालयात न जाताही इन्शुरन्स क्षेत्रात कार्य करण्यासाठी इन्शुरन्स एजंट म्हणून काम करणे हादेखील एक चांगला पर्याय आहे. 18 वर्षांवरील आणि किमान 12 वी पास अशी शैक्षणिक पात्रताधारक व्यक्ती या पदासाठी पात्र ठरते. एजंटची निवड करण्यासाठी एलआयसीद्वारे पात्रता परीक्षेचे आयोजन केले जाते.**]**

अनुभवाचे बोल!

सौ. अश्विनी सानप (पोलीस उपायुक्त मुंबई पोलीस दल - मुख्यालय 2)

आज प्रशासन व अनेक क्षेत्रांत अनेक महिला उच्च पदांवर कार्यरत आहेत; मात्र त्यामधील पोलीस सेवेमध्ये रुजू होणाऱ्या महिला आजही फार कमी आहेत. या अत्यंत आव्हानात्मक क्षेत्रात यशस्वी वाटचाल करणाऱ्या अश्विनी सानप या महिला अधिकारी आपल्या सर्वांसाठीच प्रेरणादायी असे व्यक्तिमत्त्व आहे.

2004 मध्ये MPSC परीक्षेच्या माध्यमातून सानप मॅडमची महाराष्ट्र पोलीस सेवेत पोलीस उपअधीक्षक या पदी निवड झाली. त्यानंतर पदोन्नती मिळून त्या पोलीस उपायुक्त या पदावर मुंबई मुख्यालय 2 येथे कार्यरत आहेत.

या क्षेत्रातील करिअरविषयी सानप मॅडमकडून जाणून घेण्यासाठी पुढील व्हिडिओ पाहा.

श्री. सुनील लिमये (अप्पर प्रधान मुख्य संरक्षक - वनविभाग)

निसर्गाची आवड असलेल्या व्यक्तीला जर निसर्ग संवर्धन हे करिअर म्हणून निवडायला मिळाले, तर ते केवळ त्या व्यक्तीसाठीच नाही, तर समाजासाठीही लाभदायक ठरू शकतं. याचंच उत्तम उदाहरण म्हणजे वनविभागाचे अप्पर प्रधान मुख्य संरक्षक (नागपूर) श्री. सुनील लिमये. लिमयेसर हे 1988 च्या बॅचचे IFS अधिकारी असून तत्पूर्वी त्यांनी जिऑलॉजीमध्ये B.SC व फॉरेस्ट्रीमध्ये M.SC पूर्ण केले आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे संचालक, तसेच मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या व उच्च पदांवर त्यांनी काम केले आहे. सामाजिक वनीकरणामध्येही त्यांचे मोठे योगदान आहे.

वनांचे संरक्षण व संवर्धन याचा दांडगा अनुभव असणारे कर्तृत्ववान IFS ऑफिसर ही लिमये सरांची ओळख आहे.

त्यांचा या क्षेत्रातील प्रवास व एकंदरीतच IFS या क्षेत्रातील संधी यांविषयी लिमये सरांकडून जाणून घेण्यासाठी पुढील व्हिडिओ पाहा.